महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५
अंतर्गत लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी,
नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी,
प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी
अधिसूचित करण्याबाबत.

**मालवण नगरपरिषद**

प्रशान विभाग

कार्यालयीन आदेश क्रमांक-मानप/कार्या-०२/मलोहअ/१२९३/२०१५

मालवण

दिनांक ७ जुलै, २०१५.

वाचा:- i) सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५

ii) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दिनांक २३ जून, २०१५.

iii) कार्यालयीन अधिसूचना क्रमांक मानप/कार्या-०२/१२८६/२०१५ दिनांक ६ जुलै, २०१५.

कार्यालयीन आदेश

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ दिनांक २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आलेला आहे.

या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी पुरवित असलेला लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचना करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मालवण नगरपरिषद जावक क्रमांक मानप/कार्या-०२/१२८६/२०१५ दिनांक ६ जुलै, २०१५ अन्वये अधिसूचना जाहिर करुन प्रगटन करण्यात आलेली आहे. त्यानुसार नगरपरिषदेकडील सर्व कार्यासन प्रमुख यांनी याप्रमाणे अंमलबजावणीकरावयाची आहे.

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ५ दिनांक २८/०४/२०१५ प्रशासन विभाग, मालवण नगरपरिषद येथे अवलोकनासाठी उपलब्ध आहे.

सोबत - अधिसूचना

मुख्य अधिकारी
मालवण नगरपरिषद

प्रत - सर्व कार्यासन प्रमुख, मालवण नगरपरिषद

Scanned by CamScanner

# मालवण नगरपरिषद, मालवण जिल्हा- सिंधुदुर्ग

# अधिसूचना

संदर्भ :- १. सन २०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश क्र.५
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. एससीओ-२०१५/ प्र. क्र. १८९ / नवि १४
दिनांक २३ जून २०१५

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मालवण नगरपरिषद क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहेत. तसेच त्यांची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशीत अधिकारी, तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि विहीत कालमर्यादा अधिसूचित करुन जाहीर प्रगटन करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश- २०१५**

**कलम-३ अन्वये नगरपालिका (क-वर्ग)/ नगरपंचायतने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**

| अ. क्र. | लोक सेवांची सुची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रु.२०/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रु.२०/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तव्याचा पुरावा<br>३. वयाचा पुरावा<br>४. विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५. ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | ९० दिवसापर्यंत रु.५०/-<br>१ वर्षापर्यंत रु.१५०/-<br>१ वर्षानंतर रु. २५०/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रु.२०/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रु.२०/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत/ बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर) | अंतिम खरेदी खताच्या अनु. २मध्ये उल्लेख बाजारमुल्य/मोबदला यातील जास्त रकमेवर १% | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
|  | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वारस हक्क प्रमाणपत्र | रु.५००/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/ सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | प्रति दाखला रु.५०/- | ७ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/ सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | प्रति दाखला रु.१००/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तुविशारदाचा दाखला.<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनाची प्रत | छाननी शुल्क निवासी<br>१५० चौ.मी. रु.१००/-<br>३०० चौ.मी. रु.२००/-<br>३०० चौ.मी. रु.३००/-<br>वाणिज्य, व्यावसायिक, असेंब्ली बिल्डींग,स्टोअरेज, औद्योगिक बिल्डिंग<br>१५० चौ.मी. रु.३००/-<br>३०० चौ.मी. रु.४००/-<br>३०० चौ.मी. रु.६००/-<br>विकास शुल्क<br>स्थानिक बाजार मुल्य दराच्या किंमतीवर<br>निवासी २ %<br>वाणिज्य ४ %<br>उपविभागणी<br>स्थानिक बाजार मुल्य दराच्या किंमतीवर<br>जमीन विकास शुल्क ०.५०% | ६० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | प्रमाणपत्र फी रु.२००/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| ११ | भोगवटा प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३. जोते प्रमाणपत्र<br>४. घर मालक/वास्तुविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | प्रमाणपत्र फी रु.२००/- | ३० दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| १२ | नळजोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | अ) नमुना अर्ज फी रुपये २५/-<br>ब) सेवा शुल्क<br>शहरातील शहराबाहेर<br>१/२" घरगुती रु.२००/- रु.४००/-<br>वाणिज्य रु.४००/- रु.८००/-<br>औद्योगिक रु.१०००/- रु.२०००/-<br>३/४" घरगुती रु.४५०/- रु.५००/-<br>वाणिज्य रु.९००/- रु.१०००/-<br>औद्योगिक रु.१५००/- रु.४५००/-<br>१" घरगुती रु.५००/- रु.६००/-<br>वाणिज्य रु.१०००/- रु.१५००/-<br>औद्योगिक रु.२५००/- रु.५०००/-<br>११/२" घरगुती रु.६५०/- रु.७००/-<br>वाणिज्य रु.१२००/- रु.२०००/-<br>औद्योगिक रु.३०००/- रु.६५००/-<br>२" घरगुती रु.८५०/- रु.१०००/-<br>वाणिज्य रु.१६००/- रु.३०००/-<br>औद्योगिक रु.४०००/- रु.८५००/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |
| १३ | जलनि:सारण जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | -- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | सहाय्यक कार्यालय निरीक्षक | मुख्याधिकारी |

सही/-
अध्यक्ष
मालवण नगरपरिषद

सही/-
मुख्य अधिकारी
मालवण नगरपरिषद

Scanned by CamScanner